Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर–४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Ema

क्र. कोविमं/डीपी/भौ.सु./ ३६५१
दिनांक : 17 OCT 2025

प्रति,

शिक्षणाधिकारी(माध्य.),
जिल्हा परिषद,
सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय: माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधेबाबत...**

**संदर्भ :** १. राज्यमंडळ,पुणे यांचे क्र.रा.मं.परीक्षा-८/३२६९ दि.२५.०९.२०२५ चे पत्र.
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कोविमं/डीपी/भौ.सु./ ३४०० दि.२९.०९.२०२५
३. मा.अध्यक्ष, राज्यमंडळ, पुणे यांनी व्ही.सी.मध्ये दि.१५.१०.२०२५ रोजी दिलेल्या सूचना

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रावर खालीलप्रमाणे भौतिक सुविधा असाव्यात असे संदर्भीय पत्रान्वये राज्यमंडळ, पुणे यांनी कळविले आहे. संदर्भीय पत्र ०२ नुसार विभागीय मंडळाकडून त्याबाबत सर्व परीक्षा केंद्र असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. त्यामध्ये दि.१५.१२.२०२५ अखेर भौतिक सोयीसुविधा पूर्तता करण्याबाबत कालमर्यादा दिली होती.

तथापि संदर्भ क्र.०३ मधील सूचनेनुसार परीक्षा केंद्रे अंतिम करायची असल्याने दि.१५.११.२०२५ अखेर आवश्यक भौतिक व तांत्रिक सोयीसुविधा पूर्ततेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रमुख ०५ भौतिक व तांत्रिक सोयीसुविधांसह आवश्यक सर्व भौतिक व तांत्रिक सुविधांची परीक्षा केंद्र असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून मुदतीत होणे आवश्यक आहे. यास्तव या पत्रासोबत परीक्षा केंद्र भौतिक सुविधा तपासणी अहवाल नमूना **(प्रपत्र-अ)** आपणास देण्यात येत आहे. त्यानुसार आपण व आपल्या अधिनस्त सर्व गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत सर्व परीक्षा केंद्रांची पाहणी / भेट देऊन केंद्रनिहाय **(प्रपत्र -अ)** सादर करुन या कार्यालयास दि.०७.११.२०२५ रोजी अखेर अहवाल सादर करण्यात यावा. तपासणी झाल्यानंतर प्रपत्राची प्रत संबंधित परीक्षा केंद्र असलेल्या शाळा/ क.महाविद्यालय व संबंधित संस्थेस देऊन पोहोच घ्यावी. त्यात दि.१५.११.२०२५ पर्यंत सर्व सुविधा उपलब्धता करण्याबाबत निर्देश द्यावेत.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत - १. सर्व गटशिक्षणाधिकारी, सातारा, सांगली व कोल्हापूर
२. मुख्याध्यापक / प्राचार्य - परीक्षा केंद्र असणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये व संबंधित शिक्षण संस्था - मंडळ परीक्षेसाठी आवश्यक सोयीसुविधा विहित मुदतीत उपलब्ध करुन द्याव्यात. उपरोक्त भौतिक सुविधांबाबतचा होणारा कोणताही खर्च हा मंडळामार्फत अदा केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

| इ.१०वी | इ.१२वी |
|---|---|

# महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रपत्र-अ** परीक्षा केंद्र भौतिक सुविधा तपासणी अहवाल - २०२५-२६

जिल्हा- तालुका- परीक्षा केंद्र क्रमांक-
परीक्षा केंद्र शाळेचे / क.महाविद्यालयाचे नाव- इयत्ता - १० वी / १२ वी
मुख्याध्यापक / प्राचार्यांचे नाव - मोबाईल नं.-
शिक्षण संस्थेचे नाव -

| अ.क्र | भौतिक सुविधा प्रकार | स्थिती | | परीक्षार्थी संख्येनुसार आवश्यक संख्या | शेरा (त्रुटी) |
|---|---|---|---|---|---|
| | | वापरण्यायोग्य संख्या | अयोग्य / बंद संख्या | | |
| १ | एकूण वर्गखोल्या | | | | |
| २ | त्यापैकी २५ बँचेस क्षमतेच्या वर्गखोल्या | | | | |
| ३ | बँचेस / डेस्क | | | | |
| ४ | वीज दिवे / ट्यूब (प्रत्येक वर्गखोलीसाठी) | | | | |
| ५ | पंखे (सीलींग फॅन) - प्रत्येक वर्गखोलीसाठी | | | | |
| ६ | जनरेटर / इनव्हर्टर - केंद्रासाठी | | | | |
| ७ | शाळा आवारात पुरेशा संख्येत CCTV कॅमेरे संख्या | | | | |
| ८ | परीक्षेशी संबंधित प्रत्येक वर्गखोल्यांमधील CCTV कॅमेरे संख्या | | | | |
| ९ | पिण्याच्या पाण्याची टाकीची संख्या | | | | |
| १० | मुबलक पाणी उपलब्धता / क्षमता | | | | |
| ११ | मुलींसाठी स्वच्छतागृह संख्या | | | | |
| १२ | मुलांसाठी स्वच्छतागृह संख्या | | | | |
| १३ | शाळेची / क.महाविद्यालयाचे संरक्षक भिंत सुस्थितीत (पक्की) आहे काय ? | | | होय / नाही | |
| १४ | नसल्यास - तारेचे कुंपण आहे का ? जेणेकरुन परीक्षा केंद्रात अनधिकृत प्रवेश होणार नाही. | | | होय / नाही | |
| १५ | शाळेत प्रवेश करण्यासाठी उपलब्ध असलेल्या गेटची संख्या व स्थिती ? | | | | |
| १६ | वर्गखोल्यांच्या सर्व खिडक्यांना जाळी लावलेली आहे का ? | | | होय / नाही | |
| १७ | उपरोक्त मुद्यांशिवाय आढळून आलेली अन्य त्रुटी नमूद करावी. | | | | |
| १८ | परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधांबाबत तपासणी अधिकाऱ्यांचे सुस्पष्ट अभिप्राय | | | | |

केंद्रशाळा प्रमुखांची स्वाक्षरी
पदनाम
दिनांक - / /

१. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी
नाव -
पदनाम-
मोबाईल नं. -

२. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी
नाव -
पदनाम -
मोबाईल नं. -

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,

.........................................., (परीक्षा केंद्र असलेल्या शाळा / क.महाविद्यालय)

**टिप - उपरोक्त तपासणी अहवालात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता / भौतिक सुविधांची उपलब्धता दि.१५.११.२०२५ अखेर प्राधान्याने करावी. अन्यथा परीक्षा केंद्र रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**